म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं.
सन १९२६

ठी मेळ्यांतील

# ऐतिहासिक गाणीं.

3199



## कवि-दादाभाई.

पब्लिशरः-दाजीबा गणपत जाधव, टेंभी, ठाणें.

रामचंद्र येसू शेडगे, निर्णयसागर प्रेस,
, कोलभाट लेन, मुंबई.

REFBK-0003169
REFBK-0003169

सन १९२६.

# मेळ्यांतील कार्यकारी मंडळी.

रा. रा. मारुती शि. तनपुरे, **अध्यक्ष.**

,, ,, दाजीबा गणपतराव जाधव, **उपाध्यक्ष.**

## मंत्री.

रा. रा. गोपाळ सोनू पवार. रा. रा. कृष्णाजी बा. जाधव.

रा. रा. तुकाराम गो. भोईर, **कॅप्टन.**

## कार्यकारी मंडळ.

रा. रा. शंकर पु. भोईर.
,, ,, धोंडू लक्ष्मण कदम.
,, ,, रामचंद्र कृ. कुडपने.
रा. रा. शंकर ना. यादव.
,, ,, बाळकृष्ण रा. सकपाळ.
,, ,, बाळकृष्ण वि. शिंदे.

## मुलें.

शंकर ल. यादव.
अनंत ना. पेडणेकर.
आत्माराम कृ. महागांवकर.
गणपत द. उत्तेकर.
गोविंद गो. टेंभे.
रामा भि. सरनोबत.
दत्तू बा. कनेकर.
बाबू दु. पवळे.
वसंत दा. बेलोसे.
गणपत गो. मोरे.
तुकाराम बा. गोरे.
बाबू एकनाथ.
पांडुरंग सखाराम.
रामचंद्र गो. कदम.
अनंत धा. भोईर.
पांडुरंग मु. पोवार.
रामचंद्र कृ. यादव.
शंकर ह. बोबडे.
रामचंद्र बा. बामणे.
दामू श. जगदाळे.
मनोहर कों. पवळे.
रामचंद्र गो. टेंभे.
शंकर स. गुरव.
धोंडू बा. घाटगे.
शिवराम स. जाधव.
विठ्ठल ल. कदम.

REFBK-0003169

# [प्रस्ता]वना.

[illegible] ३१९६ ... शाखा ...

स्वराज्य! महाराष्ट्राला स्वातंत्र्यसुख देणारी मराठेशाही! श्रीशिवकाळ! त्या पुण्यमय काळाची स्मृति प्रचलित काळांत लेखक कादंबरीलेखनानें, कवि, प्रतिभासंपन्न काव्यांनीं, चलच्चित्रकार चित्रपटांनीं आणि कांहीं दुराग्रहरहित इतिहाससंशोधक, संशोधनानें करून देत आहेत.

यांपैकींच एक कामगिरी ठाणें येथील एक अज्ञात कवि श्री. 'दादाभाई' हे गतवर्षापासून बजावीत आहेत. त्यांनीं गतवर्षी खास येथील 'मावळी मेळ्याकरितां' श्रीशिवकालीन निरनिराळ्या प्रसंगांवर पदें व पोवाडे लिहून दिले, आणि मेळ्यानेंही ते मेहनतीनें बसवून कवि 'दादाभाई' यांच्या श्रमांचें चीज केलें होतें. ठाणेंकरांत 'मावळी मेळ्याचा' जो बोलवाला झाला, व हिंदू समाजाच्या निरनिराळ्या ज्ञातींतील विशेषतः ब्राह्मणांतीलही सद्गृहस्थांनीं मेळ्याच्या पदांपोवाड्यांचे कार्यक्रम करविले इतकेंच नव्हे तर महाराष्ट्रीयांप्रमाणेंच गुजराथी बंधूंनींही सोन्याचांदीचीं पदकें, मंदील व रोख रुपये वगैरे पारितोषिकें दिलीं, तीं मेळ्याची मेहनत वजा करतां केवळ कवि 'दादाभाई' यांच्या कवित्वावरच होत. या वर्षीचेही पदेंपोवाडे स्फूर्तिदायक व उठावदार झालेले आहेत. कवि 'दादाभाई' यांची ही कृति त्यांच्या व 'मावळी मेळ्या'च्या कीर्तींत भरच घालील यांत शंका नाहीं.

अलीकडे मेळ्यांतील काव्य म्हणजे बहुशः सामाजिक अथवा राजकीय बाबतींतील प्रतिस्पर्ध्यांची व्यक्तिशः भरपूर निंदा करण्याचें अथवा अचकटविचकट शब्दप्रयोग-किंबहुना गालिप्रदान करण्याचें साधन होऊन राहिलें आहे! राजकारणांतील महाराष्ट्राच्या 'राजधानीं'तही कधीं कधीं या प्रकारास इतका हिडिसपणा येतो कीं, या गणेशोत्सवासारख्या मंगल सणाला 'फाल्गुनी' स्वरूप येतें!!

परंतु मोठ्या समाधानाची व अभिमानाची गोष्ट ही का, कवि 'दादाभाई' या असल्या मोहाला बळी पडले नाहींत! 'भटाळलेला' व 'भटभाई' या शब्दयोजनेंतील खोंच जाणण्याइतके वाचक समंजस असल्यामुळें त्या संबंधानें जास्त लिहिण्याची आवश्यकता नाहीं!

कवि 'दादाभाई' हे स्वतः मावळ्यांचे वंशज आहेत; व ते 'अशिक्षित' आहेत ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे! या कवींचें ध्येय मेळ्यांसाठीं पदें करणाऱ्या इतर 'झुंजप्रिय' कवींनीं नजरेसमोर ठेविल्यास निष्कारण वाद माजणार नाहीं, व श्रीगणपत्युत्सवासारख्या उत्सवांत स्वरक्षणासाठीं गोरे-हिंदी नव्हेत-शिपाईप्यायांची मदत घेण्याचा प्रसंगही कोणावर येणार नाहीं. असो.

पद्यांसोबत प्रकाशकांनीं हे दोन शब्द लिहिण्याची संधि दिल्याबद्दल त्यांचा मी आभारी आहें. शेवटीं कवि 'दादाभाई' यांची काव्यशक्ति श्रीशिवभक्तीचे योगानें उत्तरोत्तर वाढत जावो अशी श्रीमंगलमूर्तिचरणीं प्रार्थना करून हे दोन शब्द पुरे करतों.

मुंबई रोड, ठाणें.
ता० ११ सप्टेंबर १९२६.

आपला,
**मारुती शि. तनपुरे.**

३९८५

# हद्गत.

महाराष्ट्राच्या नरवीरमालिकेंतील **शौर्यस्मरण मालुसरे, कंक, पालकर** या रणशूर वीरांच्या जन्मभूमींचें दर्शन घेण्याची कित्येक दिवसांची माझी इच्छा गतवर्षी कांहीं अंशानें फलद्रूप झाली. शहरवासियांस कोणत्या ना कोणत्या-तरी प्रकारें वरील स्वातंत्र्यवीरांची आठवण होत असते. परंतु खेदाची गोष्ट ही कीं, या रणमर्दांच्या तेथील वंशजांस स्वतांच्या पूर्वजांच्या शौर्याची किंवा नांवलौकिकाची जितकी जाणीव असावयास पाहिजे तितकी ती नाहीं! आणि स्मृति होत राहील असें साधनहि नाहीं! किती हा अज्ञानांधकार! काय ही अनास्था!! त्या त्या वीरांच्या, पुण्यमय जन्मस्थळीं त्यांचें स्मारक म्हणून एखादा स्तंभ कां होईना, महाराष्ट्रीयांकडून उभारला जाईल तो सुदिन!

हा अंधकार पाहून तो अल्पांशानें घालविण्याचा प्रयत्न करावा असें वाटूं लागलें. अर्थात् हा प्रयत्न आमच्या लोकांच्या आवडीनुरूप झाल्यास बरा; म्हणून या मर्दानी वीरांच्या गुणवर्णनपर रागदारी चिजांचे धर्तीवरील पदांचे ऐवजीं पोवाडे व लावण्या विशेष रचूं लागलों.

येथपर्यंत तर पल्ला गांठला, पण ही अल्प सेवा बांधवांपुढें येण्यास सांपत्तिक स्थिति आड येत होती. परंतु **श्रीगणरायाचे कृपेनें** तोही योग आला! श्रीगणपत्युत्सवांत येथील टेंभी भागांतील कार्यकर्त्या उत्साही तरुणांपैकीं **श्री. शंकरराव यादव, श्री. दाजीबा जाधव,** व **श्री. गोपाळराव पवार** यांनीं 'मावळी मेळा' काढण्याचा निश्चय केला होता. आणि त्या मेळ्यासाठीं माझें 'वेडें वांकुडें' कवन घेण्याचें ठरविलें, व तें त्यांनीं अत्यंत मेहनतीनें व आस्थापूर्वक बसवून येथील तरुण ज्ञातिबांधवांत नवशक्ति उत्पन्न करण्याचें श्रेय घेतलें.

मला प्रोत्साहन दिल्याबद्दल 'मावळी मेळा' चालकांचा मी फार आभारी आहें. या वर्षी मुंबई येथील **श्रीमंत शेठ पांडुरंग जावजी,** जे. पी. मालक 'निर्णयसागर' प्रेस ह्यांनीं कोणत्याही प्रकारचा मोबदला न घेतां यावेळीं मेळ्यांचें कवन छापून दिल्यानें तें त्यांच्या ह्या औदार्यानेंच साक्षर महाराष्ट्र-जनतेपुढें येत आहे, याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें. वरील योग येण्यास माझे स्नेही **श्री. दाजीबा जाधव** हे कारणीभूत असल्यानें त्यांचेही आभार मानले पाहिजेत; परंतु तसें केल्यास स्नेहसंबंध मर्यादित केल्यासारखा होईल, ह्मणून या ठिकाणीं त्यांचा फक्त नामनिर्देश करणेंच इष्ट होय. शेवटीं हें कवन **महाराष्ट्रनरवीरमालिकेंतील रणमर्दांचे चरणीं** वाहून रजा घेतों.

सिव्हिल हॉस्पिटलचे
नजीक, ठाणें,
ता० ११ सप्टेंबर १९२६.

आपला नम्र,

**'दादाभाई.'**

ठाणें येथील

# मावळी मेळ्याचीं ऐतिहासिक गाणीं.

## वर्ष पहिलें.

॥ पद ॥ ( चाल–मारा तनमा मनमा. )

नमोनी गणपती, नमो सरस्वती, नमूं या शिवरायासी ॥
करूं देशकार्य, नमूं गणराय ॥ वंदन करूं या त्यासी ॥ नमोनि गणपती० ॥ १ ॥
विघ्न निवारिता, तो सुखकारिता ॥ प्रथम वंदुं या त्यासी ॥ नमोनि गणपती० २

॥ पद ॥ ( चाल–होईं विजयी तूं रंभे. )

आला आला तानाजी मावळा । उदयभानु भ्याला शेलार मामाला ॥ ध्रु० ॥
कंक येसाजी, प्रभू बाजी, नेताजी ।
ह्मणती धन्य शिवाजी । भेटुं त्याला ॥ आला० ॥ १ ॥
आह्मी मावळे गडी, शिवाजीचे सवंगडी ।
राजा करूं रायगडी । शिवबाला ॥ आला० ॥ २ ॥

॥ पद ॥

ध्याऊं, गाऊं शिवाच्या गुणाला ॥ ध्रु० ॥
स्वातंत्र्याचा पूर्ण शशी ॥ वंदन त्या शिवरायासी ॥
राष्ट्रवीर तानाजीला । प्राणप्रिय जाहला ॥
नमूं या, शिवाला, वीराला, बाजी प्रभूला ॥
गोब्राह्मणपालक तो । वंदूं या तयाला ॥ १ ॥

॥ पद ॥ ( चाल–घट छांडो सावरिया भरूं घगरी. )

संगें घेउनि मावळ्यांचा मेळा । आले तानाजी वीर येसाजी ॥ ध्रु० ॥
देशभक्तांचा हा मेळा । दांडपट्टा हातीं घेउनी भाला ॥ संगें ॥
रक्षूं ह्मणती महाराष्ट्राला ॥ चला भगवा झेंडा लावूं रायगडाला ॥ संगें ॥

॥ पद ॥ ( चाल-बँडची. )

मिळोनि मावळे गडी । घेऊं घोंगडी, चला सिंहगडीं, जाऊं रायगडीं होऊं संवगडी शिवाजीचे ॥ ध्रु० ॥

शिवाजी आमुचा गुरु । त्यासी नमन करूं, उद्धरूं याSSSSSS ॥ मिळोनि ॥

( चाल-लावणीची. )

आह्मी शिवबाचे शूरवीर । हातिं घेउनियां समशेर ॥ जाऊं चला० ॥
मायभूमी हांक देई, जाऊं चला सर्वेही ॥
शिवबाच्या स्वप्नीं जाई, धन्य प्रसवली जिजाई ॥
आह्मी देशासाठीं लढणार ॥ हातीं घेउनियां समशेर ॥ जाऊं चला० ॥
हिंदूधर्म लया जाई, ऐसे वर्तती यवन सर्वेही ॥
राष्ट्रवीर ह्मणतां तुह्मी ? लक्ष लावा स्वधर्मीं ॥
आह्मी धर्मासाठीं मरणार ॥ हातीं घेउनियां समशेर ॥ जाऊं चला० ॥

लावणी ( चाल-असा रामाच्या राज्याचा न्याई० ॥ )

शिवबाला सांगे जिजामाई ॥ कोंडाणा किल्ला तूं घेई ॥ ध्रु० ॥
शिवाजीनें केला विचार, मिळविले मावळे वीर, स्वारी करूं या कोंडाण्यावर,
गड झाला पाहिजे सर, अशी बोलते मातुश्री आई ॥ कोंडाणा० ॥ १ ॥
तानाजी बोले शिवबाला, तुह्मी नका जाऊं लढाईला, संगें घेतों मी सूर्याजीला, मामा बी येतों ह्मणाला, जर कां दगा झाला तुह्मां कांहीं ॥
कोण राखिल मराठेशाही ॥ शिवबाला० ॥ २ ॥
संगें घेऊन मावळे लोकांला, तानाजी गडापासीं गेला, तो रस्ताच उमगना त्याला, त्या गांवचा नाईक वश केला, तुला गांव इनाम देऊं पाहीं ॥ रस्ता आमास्नी दाऊन देई ॥ शिवबाला० ॥ ३ ॥
तानाजी ह्मगे मामाला, घोरपड लावावी गडाला, ती धरीचना गडाला, मामा ह्मणे अपशकुन झाला, धांव ह्मणती भवानीमाई ॥
घोरपड गडावरती जाई ॥ शिवबाला० ॥ ४ ॥

मग सांगे सूर्याजीला, तूं जाईं कल्याण-दरवाज्याला, आह्मी चढुन जाऊं गडाला, तेथून इशारा देऊं तुला, ताना करितो तुझ्यासाठीं घाई ॥
धन्य धन्य पतिव्रता बाई ॥ शिवबाला० ॥ ५ ॥
फौजेसहित गडावर गेला, खूण केली सूर्याजीला, उदयभानू लढूं लागला, त्यांत तानाजी पडला, अशा पतिव्रतेच्या पायीं ॥
तानाजी स्वर्गाला जाई ॥ शिवबाला० ॥ ६ ॥
मामा बोले उदयभानुला, सूड घेउं दे भाच्याचा मला,
पहिल्या दमांत उदयभानू मेला, मोंगलांचा धीर खचला,
मोंगलसैन्यं मेलीं ठाय ठायीं ॥ त्यांची गणतिच करवत नाहीं ॥
शिवबाला० ॥ ७ ॥

ही बातमी कळली शिवबाला, तो पळत गडावर आला,
गड आला परी सिंह गेला, ह्मणुन ह्मणती सिंहगड त्याला,
आतां बुडाली मराठेशाही ॥ मावळयांचा दाता कोणी नाहीं ॥
शिवबाला० ॥ ८ ॥

## पोवाडा.

बाल मावळे, बाल शिवाजी, बाल्यापासोनी ।
देशभक्तिचे बालमनोरथ, वाढविती स्वमनीं ॥ १ ॥
बालकल्पना, देशभक्तिची, बाल शिवाजीला ।
रुचली, आलीं राजकारणीं गोड फळें तिजला ॥ २ ॥
तोरण किल्ल्यावरी बांधुनी विजयतोरणाला ।
विजापूरच्या द्रव्यनिधीनें भंडारा केला ॥ ३ ॥
प्रतापगडची मायभवानी निराश झालेली ।
शिवदेवाचे खेळ पाहुनी आज पुन्हा हंसली ॥ ४ ॥
पन्हाळगडिं मग तुरी देउनी शिद्दीच्या हातीं ।
स्वातंत्र्याचा गरुड उडाला सिंहगडावरतीं ॥ ५ ॥
तो उदयभानु राठोड, तोडिला तोड, बंधुची जोड, गड झाला सर,
परि गेला, केसरी मराठ्यांमधला, राष्ट्राच्या कामीं आला ।
देशासाठीं देह ठेउनी स्वर्गाला जाऊं ।
स्वातंत्र्याच्या स्वराज्यरविला अर्घ्योदक देऊं ॥ ६ ॥

## पोवाडा.

तळहातावरि शीर घेउनी रात्रंदिन खपुनी ।
श्रीशिवजीवित सार्थक झालें स्वराज्य स्थापोनी ॥ १ ॥
असो मानसीं छत्रपतींची ठेवुनि नित्य स्मृती ।
उद्योगानें सतत करावी तनु सार्थक जगतीं ॥ २ ॥
महाराष्ट्राच्या रायगडाच्या पत्थरांत अजुनी ।
स्वराज्य ऐसे शब्द उठति जा, जा ऐका कोणी ॥ ३ ॥
पत्थर केवळ निर्जिव सृष्टी स्वराज्य तो बोले ।
सजिव माणसें आह्मींच कां मग? झांकावे डोळे ॥ ४ ॥
रडूं नको शिवशाही विभवा रायगडा पूस-
डोळे, पुनरावृत्ती होइल इतिहासीं खास ॥ ५ ॥
महाराष्ट्रप्रभूचा प्यार, शूर शिलदार, शांत गंभीर, हा देश रामदासांचा
तानाजी, बाजी, शिवबाचा, प्रिय प्राण लोकमान्यांचा।
भारतभूला स्वातंत्र्यानें घालित हा न्हाऊं ।
मनोहराला झालें केव्हां महाराष्ट्र पाहूं! ॥ ६ ॥

कवि-मनोहर.

---

# वर्ष दुसरें.

गणराया, आह्मी मावळे लागतों पायां ॥ देईं बुद्धि तुझे गुण
गाया, गणराया, भक्ता या, बा मोरया ॥ ध्रु० ॥ गण० ॥

मंगलमूर्ती गौरीहरा तूं गणेशा ॥
विघ्ननाशका, गजानना तूं रक्षिं महाराष्ट्रदेशा ॥
वंदन करुनी तुजसी आह्मी, लागुं देशकार्या ॥
राष्ट्रकार्यीं शिवराया, रक्षिलें त्वां मोरया ॥ गणराया आह्मी० ॥

## वसईचा पोवाडा.

शाहू छत्रपती महाराज त्यांचे पेशवे चालविती राज ॥
पहा त्या बाजीरावाचें तेज शरण येती परकी राज ॥ ध्रु० ॥

ग्रं. क्र. ३७६९ स्थळ

मर्द बाजीराव वीर, संगें मल्हारी होळकर शिंदे दाभाडे पोवार,
मावळे सरदार, शूर बहाद्दर, चल० जी० जी० ॥ १ ॥

स्वारी करुनी माळव्यांत, परतले बाजी शहर पुण्यांत ।
फिरंग्यांनीं केली बहु मात वसईप्रांतांत ॥
फिरंग्याला चढला माज, हिंदुधर्म बुडेल आज, असून मराठ्यांचें
राज, शाहू महाराज राखा लाज, चल० जी० जी० ॥ २ ॥

हिंदुधर्माचा छळ मांडिला, ही बातमी कळली पेशव्याला ॥
चिमणाजी आप्पा शूर भला सांगे बंधूला ॥
संगें द्यावे शूरवीर, चालुन जातों मी वसईवर, किल्ला करून येतों
सर, हा निर्धार आहे बेहेत्तर, मेलों तर, चल० जी० जी० ॥ ३ ॥

आप्पानें पण हा केला, जमवुनी सरदार लोकांला ॥
मल्हाररावाशीं हुकुम दिला, जावें ठाण्याला ॥
मर्द मल्हारी होळकर, स्वारी करतो ठाण्यावर, किल्ला केला त्यानें
सर, मारले सरदार, पेद्रू वीर, चल० जी० जी० ॥ ४ ॥

छापे घालीत फिरंग्यांवरी, चालला हिंदपुत्र मल्हारी ॥
फौजेसहित आप्पाची स्वारी, आली वज्रेश्वरी ॥
आप्पानें नवस केला, वज्रेश्वरीभवानीला, यश येऊं दे आह्मांला,
मारुं वैऱ्याला, फिरंग्याला, चल० जी० जी० ॥ ५ ॥

श्रीमंतांची चालली स्वारी, ओवाळिती नगरच्या नारी ॥
आले हिंदुधर्माचे कैवारी, राव मल्हारी ॥
मराठ्यांचें सैन्य फार, करिती फिरंगी विचार, ह्मणती मराठ्यांचे
वीर, किल्ला सर आह्मीं करणार, चल० जी० जी० ॥ ६ ॥

युद्ध चाललें घनघोर, फिरंगी करिती तोफेचा मार ॥
कामा आले मराठे वीर, पडला विचार ॥
चिमणाजी रणधीर, ह्मणे ऐका हो सरदार, किल्ला नाहीं झाला सर,
उडवा शीर, किल्ल्यावर, चल० जी० जी० ॥ ७ ॥

श्रीमंतांचा पाहुनी निर्धार, बोलती मराठे सरदार ॥
किल्ला केल्याविना सर, नाहीं फिरणार ॥
किल्ल्यामध्यें गुप्त हेर, गेले खंडूजी मानकर, पांचकळशी-अंजुरकर,
होउनी सुतार भेदी वीर, चल० जी० जी० ॥ ८ ॥

सुरुंग लाविती शिंदे राणोजी, दर्यासारंग आंग्रे मानाजी ॥
हल्ले करित चाले चिमणाजी, शूर रणगाजी ॥
लढाईचा पाहुनी रंग, शिंदे उडविती सुरुंग, तट झाला असे दुभंग,
कठिण प्रसंग, ह्मणति फिरंग, चल० जी० जी० ॥ ९ ॥

पळूं लागलें फिरंगी सैन्य, सरदारपती रूप लावण्य ॥
आप्पानें करुनी सन्मान, केली पाठवण ॥
ब्राह्मण-ब्राह्मणेतर सरदार, एक होउनी झाले स्वार, घेऊन धर्माचा
कैवार, तेचि खरे राष्ट्रवीर, चल० जी० जी० ॥ १० ॥

छत्रपती शाहू शिवाच्या वेळीं, भेद आपसांत नव्हता मुळीं ॥
मोडा आपसांतील दुफळी, या विनाशकाळीं ॥
बुडली मराठे पेशवाई, आतां झाली नोकरशाही, मावळे लागताती
पायीं, मोडुनी दुही, आठवा शिवशाही, चल० जी० जी० ॥ ११ ॥

॥ पद ॥ ( चाल-राधा प्यारी दे ढारो. )

रायगडीं जाऊं चला ॥ शिवराया वंदूं चला ॥ ध्रु० ॥
वैशाख द्वितीयेला पुढिल सालीं जाऊं चला ॥ रायगडीं० ॥
तीन शतकें पूर्ण होतीं राव शिवाजीला ॥ रायगडीं० ॥
पहा देशभक्तिची ध्वजा रायगडीं, रायगडीं चला हरघडी ।
स्मरुनी मायभूमिला । आठवा त्या शिवाला ।
वंदूं शिवसमाधीला ॥ रायगडीं ॥ १ ॥

॥ पद ॥ ( चाल—बँडची. )

आला मावळ्यांचा मेळा । हातीं घेउनियां भाला ।
वंदुनी गजाननाला । करूं नमन हिंदभूला ॥ १ ॥
आह्मी हिंदपुत्र सारे । एक होऊं या रे । देह देशकार्यीं
वहा रे । शिवशाही स्मरा रे ॥ २ ॥

॥ पद ॥ ( चाल—तो हा गिरिधारी. )

ह्या महाराष्ट्र देशांत, वसणारा तोचि मराठा ॥
जरि ब्राह्मण अंत्यज जात, जाणावा तोचि मराठा ॥ ध्रु० ॥
जो बोले बोल मराठी, जो नमितो भगवा झेंडा ।
शिव समर्थ नामासाठीं तळमळतो तोचि मराठा ॥ ह्या महाराष्ट्र० ॥
ही खूण मनांत असावी, कलहेच्छा सोडुनि द्यावी ।
निजदेशीं प्रीत धरावी, तरि अस्सल तोचि मराठा ॥ ह्या महाराष्ट्र० ॥
मर्द व्हा वाटुं द्या धाक, छळकाचें नमवा नाक ।
आह्मी सारे बंधु एक, दाविल हें तोचि मराठा ॥ ह्या महाराष्ट्र० ॥

॥ पद ॥ ( चाल—गर्भा. )

धर्मपालक होते शिवराज । आह्मी हिंदु ह्मणवितों आज ॥ ध्रु० ॥
मिळवोनी मावळा । स्वधर्म राखिला । धन्य जिजाईपुत्र शिवराज ॥ आ० ॥
देशासाठीं ऐक्य करा हिंदभूमि उद्धरा । स्मरा हिंद सुपुत्र शिवराज ॥ आ० ॥

॥ लावणी ॥ ( चाल—नाचूं नाचूं पोरा. )

जाऊं जाऊं चला राखूं हिंदुधर्म आपुला ॥ परकियांचा घाला ॥
धर्मावरी आला, चला जाऊन भेटुं शिवबाला ॥ ध्रु० ॥ जाऊं जाऊं० ॥
बाजीप्रभु भला ह्मणतो मी मावळा ।
सर्व मिळून राखूं गोब्राह्मणांला ॥ जाऊं जाऊं० ॥
ब्राह्मण ब्राह्मणेतर, आपसांत करिती वैर ।
आठवा बाजीराव पहिला ॥ जाऊं० ॥
राव शिवाजीच्या, धर्मपालकाच्या आठवा तयाच्या गुणाला ॥

# अफजुलखानाचा वध.

## ( लावणी. )

महाप्रतापी हा शिवराई । त्याला अफजुल धरतो कायी ॥ ध्रु० ॥

हिंदभूला त्राता कोणी नाहीं । पाहुनी कष्टी होई जिजामाई ॥
तीनें नवसिली देवी शिवाई । अवतार शिवाचा शिवराई ॥ त्याला० ॥ १ ॥

ज्याचे संवगडी मावळे वीर । त्यानें जावळी प्रांत केला सर ।
विजापुरीं पडला विचार । ज्याला प्रसन्न भवानीमाई ॥ त्याला० ॥ २ ॥

विजापुरीं लाविला पण । तों उभा राही अफजुलखान ।
ह्मणे जीवंत आणीन धरून । खान करितो मोठी बढाई ॥ त्याला० ॥ ३ ॥

पण करुनी खान निघाला । तो आला तुळजापुराला ।
त्यानें छळिलें भवानीमातेला । भवानीचा भक्त शिवराई ॥ त्याला० ॥ ४ ॥

खान तळ देई भीमातिरीं । मनिंचा हेतु लुटावि पंढरी ।
भक्तलोक ह्मणती धांव श्रीहरी । जिथें भक्तांची माउली विठाई ॥ तिथं ॥ ५ ॥

झाले गांवचे लोक एकत्र । तेव्हां नव्हता 'भटाळलेला' मंत्र ।
ब्राह्मण मराठे मिळुनी सर्वत्र । त्यांनीं खान पळविला पाहीं ॥ त्याला० ॥६॥

खान चालला किल्ले घेइत । आला पुण्याहुनी वाईत ।
सह्याद्रीस पाहुनी झाला भयभीत । रायगडीं राहतो शिवराई ॥ त्याला० ॥ ७

खानानें वकिल धाडिला । पंत तुह्मी वश करा शिवाजीला ।
शिवाजीनें धर्म शिकविला पंताला । आमची धर्मासाठीं लढाई ॥ त्याला० ॥८

पंत ह्मणे शिवरायाला । आह्मी लागतों तुमच्या सेवेला ।
खानाला घेउनि येतों मी भेटीला । असे धर्माचे नेते 'भटमाई' ।
मानिती वंद्य शिवराई ॥ महा० ॥ ९ ॥

कृष्णाजीनें भुलविला खान । शिवाजी येतो तुह्मां शरण ।
घ्यावा कार्यभाग साधून । ह्याला दुसरा उपाय कांहीं नाहीं ॥ त्याला ॥ १० ॥

पंत सांगे अफजुलखानाला । चला जाऊं प्रतापगडाला ।
जीवंत धरा तुह्मी शिवाजीला । संगें घ्यावा एक शिपाई ॥ त्याला० ॥ ११ ॥

मोरोपंत नेताजी पालकर । यांनीं यावें घाटमाथ्यावर ॥
प्रतापगडीं भेट होणार । आह्मांसंगें तानाजी सवाई ॥ तिथं अफजुल करतो
कायी ॥ महा० ॥ १२ ॥

भेटूं लागले शिवाजी खान । खान धरितो शिवाची मान ।
असा दगा करी जेव्हां खान । वाघनखानें घेतला त्याचा प्राण ।
असा प्रतापी तो शिवराई ॥ त्याला० ॥ १३ ॥

मराठ्यांचें दैवत ब्राह्मण गायी । हा मंत्र जपुनी शिवराई ।
त्यानें स्थापिली मराठेशाही । तेव्हां नव्हतीं मतं बारभाई ।
आह्मीं हिंदपुत्र एक भाई । महाप्रतापी० ॥ १४ ॥

REFBK-0003169
REFBK-0003169

समाप्त.



म. ग्र. स. ठाण
विषय काव्य
स. नं. ३०५

ळीं-मेळ्यांतील

# ऐतिहासिक गाणीं.



कवि–दादाभाई.

3678

पब्लिशरः–दाजीबा गणपत जाधव, टेंभी, ठाणें.

येसू शेडगे, निर्णयसागर प्रेस,
, कोलभाट लेन, मुंबई.

सन १९२८.

REFBK-0003714
REFBK-0003714